# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२३

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक २६ जुलै, २०२३ / श्रावण ४, १९४५ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **सहकार मंत्री** | |
| **(२)** | **महसूल, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास मंत्री** | |
| **(३)** | **वने, सांस्कृतिक कार्ये, मत्स्यव्यवसाय मंत्री** | |
| **(४)** | **कृषी मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(५)** | **रोजगार हमी योजना, फलोत्पादन मंत्री** | |
| **(६)** | **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** | |
| **(७)** | **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - २३**

---

### राज्यात व विशेषत: नागपूर जिल्ह्यात बोगस खतांच्या तपासणीचे काम बंद असल्याबाबत

**(१) * ६४७९१ श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनेक ठिकाणी बोगस खतांची विक्री होत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बोगस खतांची विक्री करणाऱ्या कंपन्यांनी पुरवठा केलेल्या खतांबद्दल विभागस्तरावर चौकशी करुन त्याचा वस्तुस्थितीनिहाय अहवाल पाठविण्याचे निर्देश कृषी संचालक यांनी विभागीय कृषी संचालकांना दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच नागपूर जिल्ह्यात मात्र अशा स्वरुपाची तपासणी मागील काही महिन्यांपासून बंद असल्याने बोगस खते विक्री करुन शेतकऱ्यांची फसवणूक केल्याचे दिनांक १ जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन राज्यातील बोगस खतांची विक्री रोखण्यासंदर्भात संबंधित कंपन्यांवर व अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) राज्यात दर्जेदार व गुणवत्तेच्या खताची योग्य दरात विक्री होणेकरीता गुणवत्ता नियंत्रण विभागामार्फत दक्षता घेण्यात येते. राज्यात गुणवत्तापूर्ण खत मिळणेसाठी एकूण ११३१ खत निरीक्षकांची नेमणूक केलेली आहे. खरीप व रब्बी हंगामामध्ये राज्य, तक्रार निवारण कक्षांची स्थापना करण्यात आलेली आहे. राज्य, विभाग व

जिल्हास्तरावर ३९५ भरारी पथकांची स्थापना करण्यात आलेली आहे. राज्यात एकूण ६८८ उत्पादक असून ४०५ खत उत्पादकांची तपासणी करण्यात आलेली आहे. राज्यात एकूण ४६५२७ विक्रेते असून ३११७७ विक्रेत्यांची तपासणी करण्यात आलेली आहे. त्याआधारे ४२६ अप्रमाणित नमुन्यांपैकी ३६१ नमुने कोर्टकेस पात्र आहेत, त्यावर प्रचलित नियमान्वये कायदेशीर कारवाई सुरु आहे. तसेच १० न्यायालयीन दावे दाखल करण्यात आलेले आहेत. माहे जुलै २०२३ अखेर खताचा २५२ मे. टन साठा जप्त करण्यात आला असून, त्याचे मुल्य ७३ लाख इतके आहे. राज्यात २४६ खत परवाने निलंबित करण्यात आले आहेत व ५३ परवाने रद्द करण्यात आलेले आहेत. ५३९ ठिकाणी विक्रीबंद आदेश दिलेले आहेत. राज्यामध्ये १६ पोलिस केसेस दाखल करण्यात आलेल्या आहेत. नागपूर जिल्हयात १२०४ खते विक्री केंद्राची तपासणी केली असून, ४७ विक्रेत्यांना विक्री बंद आदेश देण्यात आलेले आहेत. तसेच, नागपूर जिल्हयात १७१ नमुने तपासण्यात आले असून १० नमुने अप्रमाणित आले आहेत. त्यावर पुढील कायदेशीर कार्यवाही सुरु आहे. खताबाबत शेतकऱ्यांच्या तक्रारीचे निवारण करिता तसेच लिंकिंग विषयी तक्रारीचे निवारण करीता कृषि आयुक्तालयामध्ये २४ x ७ तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्यात आलेला असून एक व्हाट्सअप नंबरची निर्मिती करुन त्यावर तक्रार नोंदविण्याचे आवाहन शेतकऱ्यांना करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हदगाव (जि.नांदेड) तालुक्यातील नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेत झालेला गैरव्यवहार

**(२) * ६८१७४ श्री.माधवराव पवार (हदगाव), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हदगाव (जि.नांदेड) तालुक्यातील अनेक गावात नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना (पोखरा) कृषी विभागातर्फे राबविण्यात येत असून यात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेंतर्गत लाभार्थ्यांना साहित्य पुरविणाऱ्या एजन्सीकडून बोगस कागदपत्रांच्या आधारे देयके मंजूर करुन घेवून लाभार्थ्यांची फसवणूक करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एजन्सी व लाभार्थ्यांकडून अर्ध्याच साहित्याची खरेदी करणे तसेच काही प्रकरणे साहित्य खरेदी न करता आयोगाच्या नावाखाली वस्तू, सेवा कर व केंद्रीय विक्री कराची बिले जोडून केवळ कागदोपत्री योजना सुरु ठेवल्याचा प्रकार माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन योजनेचा लाभ लाभार्थ्यांना देणे व संबंधित दोषींवर कारवाई करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर जिल्ह्यात राष्ट्रीय कृषी यांत्रिकीकरण अभियानांतर्गत पात्र लाभार्थ्यांना कृषी साहित्यांचे अनुदान मिळण्याबाबत

**(३) * ६९००५ श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.विकास**

**ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.माधवराव पवार (हदगाव) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यात शासनाच्या राष्ट्रीय कृषी यांत्रिकीकरण अभियानांतर्गत अनेक शेतकऱ्यांना अनुदानाचे वाटप करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील शेतकऱ्यांनी स्व:खर्चाने कृषी साहित्य विकत घेऊनही मागील चार महिन्यांपासून शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जमा झाले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य पुरस्कृत कृषी यांत्रिकी योजनेतील १९८, तर राष्ट्रीय कृषी यांत्रिकीकरण उप अभियानातील ४४९ लाभार्थी अद्यापही अनुदानापासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन लाभार्थ्यांना तात्काळ कृषी साहित्याचे अनुदान अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे :** (१) ते (४) सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात मे, २०२३ अखेरीस कृषि यांत्रिकीकरण उप अभियान अंतर्गत ३८३, राज्य पुरस्कृत कृषि यांत्रिकीकरण योजनेतील १८१ व राकृवियो अंतर्गत कृषि यांत्रिकीकरण प्रकल्प अंतर्गत ९९ लाभार्थी अनुदानासाठी प्रलंबित होते. सदर लाभार्थ्यापैकी कृषि यांत्रिकीकरण उप अभियानातील १२१ लाभार्थीचे, राज्य पुरस्कृत कृषि यांत्रिकीकरण योजनेतील ६४, तर राकृवियो अंतर्गत कृषि यांत्रीकीकरण प्रकल्प अंतर्गत ३८ लाभार्थ्यांचे अनुदानाचे वितरण करण्यात आलेले आहे. निधी उपलब्धते नुसार उर्वरित लाभार्थ्यांचे अनुदान अदा करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मंगळवेढा (जि.सोलापूर) येथे राष्ट्रीय डाळींब संशोधन केंद्रामार्फत प्रभावी उपाययोजना करण्याबाबत**

**(४) * ६९७५८ श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा (जि.सोलापूर) येथे डाळींब पिकांचे तेलकट डाग (तेल्या), मर रोग व पिन हॉल बोरर या खोड किडीच्या प्रादुर्भावामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान होवून जवळपास ६० टक्क्यांपेक्षा अधिक बागा उध्वस्त झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ठिकाणी राष्ट्रीय डाळींब संशोधन केंद्र असूनही त्याचा कोणताही फायदा डाळींब उत्पादक शेतकऱ्यांना होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांच्या फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्यामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी शासनाकडे मदत जाहीर करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी व पाहणी करुन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत तसेच राष्ट्रीय डाळींब संशोधन केंद्रामार्फत प्रभावी उपाययोजना करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) डाळींब संशोधन केंद्र, केगांव यांच्या मदतीने शेतकऱ्यांना प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्याकरिता कृषि विभाग व डाळिंब संशोधन केंद्रामार्फत डाळिंब पिकावरील किड/रोग नियंत्रणाबाबत जिल्ह्यात १७४८ प्रात्यक्षिके, ३५९५४ शेतकऱ्यांना प्रशिक्षण, १६७१७ शेतकऱ्यांना किड/रोग नियंत्रणाबाबत कृषि सल्ला वाटप, शेतकऱ्यांच्या शेतावर ४० ठिकाणी प्रक्षेत्र भेटीचे आयोजन केले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सांगली जिल्ह्यातील द्राक्ष व बेदाणा उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्यांबाबत

**(५) * ६४७०६ डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल देशमुख (काटोल), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: सांगली जिल्ह्यात द्राक्षांची शेती मोठ्या प्रमाणात होत असून वातावरणातील बदल, औषधे व खतांच्या किंमतीत झालेली वाढ, द्राक्ष निर्यातीवरील निर्बंध व द्राक्ष पिकाला हमीभाव न मिळाल्यामुळे द्राक्ष उत्पादक शेतकरी अडचणीत सापडला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच द्राक्ष व बेदाण्याचे दर कमी झाले असून ४ किलो द्राक्षाला रुपये ४० ते ८० इतका कमी दर मिळत असल्याने शेतकऱ्यांचे प्रचंड आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कृषि पीक विमा योजनेत फळपिकांचा समावेश नसल्यामुळे द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांना पीक विमा योजनेचा लाभ मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त जिल्ह्यातील द्राक्ष व बेदाणा उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्याच्या मागण्यांसाठी शेतकरी संघटनांनी दिनांक १७ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढून आंदोलन केले होते, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांच्या उपरोक्त समस्या सोडवून अन्य पिकांच्या धर्तीवर द्राक्षाला अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

पुनर्रचित हवामान आधारित फळपिक विमा योजनेत द्राक्ष या फळपिकाचा समावेश आहे.

(४) हे खरे आहे.

(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मलकापूर (जि.बुलढाणा) येथील मलकापूर अर्बन को ऑपरेटिव्ह बँकेने ठेवीदारांचे कोट्यवधी रुपये प्रलंबित ठेवल्याबाबत

**(६) * ६८७४३ श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.अमित झनक (रिसोड), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मलकापूर अर्बन बँकेमध्ये (जि.बुलढाणा) मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्यामुळे ठेवीदार व १७५ पतसंस्थांचे ३०० कोटी रुपये त्यात अडकून पडले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू बँकेतील गैरव्यवहाराबाबत कलम ८८ अन्वये चौकशी करुन दोषी संचालकांवर कारवाई करणे तसेच मालमत्ता जप्त करणे इ. मागण्यांचे निवेदन पतसंस्था ठेवीदार कृती समितीच्या वतीने दिनांक १२ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास शासनास दिले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात प्रशासक मंडळ नेमण्यासह विविध मागण्यांसाठी मलकापूर अर्बन बँक पतसंस्था ठेवीदार कृती समितीच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा येथे दिनांक १२ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास आंदोलन करण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन ठेवीदारांच्या रकमांचा परतावा देण्याबाबत व संबंधित दोषींवर कारवाई करण्याकरीता कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील : (**१) व (२) हे खरे आहे.
(३) व (४) बँकेतील विविध पतसंस्थांच्या ठेवी परत करण्यासाठी मलकापूर अर्बन बँक पतसंस्था ठेवीदार कृती समितीने दिलेले निवेदन तसेच बँकेच्या वैधानिक लेखापरिक्षण छाननी अहवालातील मुद्यांच्या अनुषंगाने मलकापुर अर्बन को ऑप बँक लि. मलकापूर या बँकेचे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८१ अन्वये चाचणी लेखापरिक्षण करणेकरिता सहकार आयुक्तांनी दिनांक १२.०७.२०२३ रोजीच्या आदेशान्वये जिल्हा विशेष लेखापरिक्षक वर्ग-१ सहकारी संस्था, अमरावती यांची नियुक्ती केली आहे. त्याअनुषंगाने बँकेचे चाचणी लेखापरिक्षण करणेची कार्यवाही सुरू आहे. लेखापरिक्षणाअंती पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पनवेल (जि.रायगड) येथील मातोश्री ग्रामसमृध्दी शेत-पाणंद योजनेंतर्गत सहा रस्त्यांचे काम बंद असल्यामुळे शेतकऱ्यांची गैरसोय होत असल्याबाबत

**(७) * ६४९०६ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) पनवेल (जि.रायगड) येथे मातोश्री ग्रामसमृध्दी शेत-पाणंद योजनेंतर्गत सहा रस्त्यांच्या कामांना मंजूरी मिळूनही सदरहू कामे बंद असल्यामुळे शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त योजनेंतर्गत नांदगाव, सांगुर्ली, गुळसूंदे, खानावले, कसळखंड व पोयंजे या गावातील सात किलोमीटर लांबीच्या या रस्त्यांच्या कामांना तांत्रिक अडचणींमुळे सुरूवात होवू न शकल्यामुळे शेतक-यांना पावसाळ्यात शेतीची अवजारे ने-आण करण्यासाठी रस्ता उपलब्ध नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करून उक्त गावातील रस्त्यांची कामे तातडीने सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
तथापि, शेतकऱ्यांच्या खाजगी जमिनीतुन जाणाऱ्या शेत/पाणंद रस्त्याच्या कामास संबंधित शेतकऱ्यांची संमती नसणे, वनविभागाच्या अखत्यारीतील शेत/पाणंद रस्ता असणे, मंजूर करण्यात आलेला रस्ता शेत/पाणंद रस्ता नसणे, या कारणामुळे काही ग्रामपंचायतींनी कामे रद्द करण्याबाबत ठराव केलेले आहेत.
(३) सदर शेत/पाणंद रस्ता ज्या शेत जमिनीतून जातो अशा शेत जमिनीच्या मालकांची संमती प्राप्त होत नाही, तथापि, अशा जमिन मालकांची संमती प्राप्त झाल्यास सदर कामे करता येतील.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**अमरावती जिल्ह्यात वृध्द कलावंताचे मानधन प्रस्ताव निवड समिती अभावी प्रलंबित असल्याबाबत**

**(८) * ६७७१७ श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.प्राजक्त तनपूरे (राहुरी), श्री.अनिल देशमुख (काटोल), श्री.शेखर निकम (चिपळूण), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), डॉ.किरण लहामटे (अकोले), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य सरकारच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाकडून राज्यातील मानधनासाठी पात्र असलेल्या ज्येष्ठ कलाकारांना मासिक मानधन न मिळता ६ महिन्यातून एकदाच एकत्रित मानधन दिले असल्याने दर महिन्याला नियमित मानधन द्यावे, अशी मागणी राज्यातील विविध संघटना व लोककलाकारांनी वेळोवेळी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील संगीत कला व विविध सांस्कृतिक परंपरा यावर चरितार्थ अवलंबून असलेल्या लोकवंतांच्या समस्या दिवसेंदिवस वाढत असून अमरावती जिल्ह्यात वृध्द कलावंताचे मानधन प्रस्ताव पंचायत समिती व समाजकल्याण विभागाच्या कार्यालयात मंजूरीसाठी निवड समिती अभावी प्रलंबीत असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त कलावंतांकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्यामुळे येथील अनेक वृध्द कलावंताच्या कुटूंबावर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन तात्काळ समित्या गठीत करुन प्रलंबित प्रस्ताव निकाली काढणे तसेच नियमित मानधन मिळण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) राजर्षी शाहू महाराज वृध्द साहित्यिक व कलाकार मानधन योजनेंतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत अ,ब,क या श्रेणीनुसार अनुक्रमे रुपये ३१५०/-, २७००/- व २२५०/- असे मानधन निधीच्या उपलब्धतेनुसार दरमहा दिले जाते. काही प्रसंगी निधी उपलब्ध होऊन तो वितरीत करण्याच्या कार्यवाहीत वेळ लागू शकतो. त्यामुळे दरमहा नियमित मानधन देण्याबाबतची मागणी काही संघटना/लोककलाकार शासनाकडे करीत असतात.
(२) राजर्षी शाहू जिल्हास्तरीय वृध्द साहित्यिक व कलावंत मानधन निवड समितीचे अशासकीय अध्यक्ष/उपाध्यक्ष/सदस्य यांची नियुक्ती दिनांक ०८.०९.२०२२ रोजी रद्द केल्यानंतर अमरावती जिल्ह्याकरीता निवड समिती पुनर्गठीत झाली नसल्यामुळे सन २०२२-२३ मधील नव्याने कलावंत निवड झालेली नाही, ही वस्तुस्थिती आहे.
(३) अशी बाब निदर्शनास आली नाही. राजर्षी शाहू महाराज वृध्द साहित्यिक व कलाकार मानधन योजनेंतर्गत माहे मे, २०२३ अखेर पर्यंतचे सर्व पात्र सन्मानार्थींचे मानधन त्यांच्या खात्यामध्ये वर्ग करण्यात आले आहे.
(४) जिल्हास्तरीय निवड समितीचे पुनर्गठन करणेबाबत संबंधित जिल्हा परिषदांना सांस्कृतिक कार्य संचालनालय यांच्या दिनांक २६.०९.२०२२, दिनांक १८.११.२०२२, दिनांक २५.०२.२०२३ व दिनांक ५ जुलै, २०२३ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. तसेच, संबंधित सन्माननीय पालकमंत्री यांनाही मा.मंत्री (सांस्कृतिक कार्य) यांचे स्तरावरुन दिनांक ०६.०४.२०२३ रोजी विनंती करण्यात आली आहे. नियमित समिती गठीत होईपर्यंत अंतरिम व्यवस्था म्हणून संबंधित जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व समाज कल्याण अधिकारी यांची तात्पुरती समिती स्थापन करुन त्याद्वारे प्राप्त अर्जांचा निपटारा करण्यात यावा, अशा सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेतून तुषार व ठिबक सिंचन योजनेचा लाभ शेतकऱ्यांना मिळण्याकरिता अट शिथील करण्याबाबत

**(९) * ६६४४६ श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कृषी विभागांतर्गत प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेच्या माध्यमातून तुषार व ठिबक सिंचनाकरिता ७० टक्क्यांपर्यंत म्हणजे जास्तीत जास्त एकरी २५ ते ३० हजार रुपयाच्या मर्यादेत अनुदान देण्यात येते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासाठी लाभार्थीकडे २० गुंठ्यापेक्षा अधिक जमीन असणे आवश्यक असल्यामुळे २० गुंठ्याच्या आतील अल्पभूधारक योजनेच्या अनुदानापासून वंचित राहत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच या योजनेंतर्गत सन २०२२-२३ मध्ये अनुदान वाटपाची टक्केवारी अत्यंत नगण्य असून या वर्षात ठिबक सिंचन लाभार्थी लकी ड्रॉ सोडत देखील काढण्यात आली नसल्याचे दिनांक १९ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन या योजनेकरिता २० गुंठ्याची अट शिथिल करुन जास्तीत जास्त लाभार्थ्यांना अनुदानाचे वाटप करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे :** (१) प्रधानमंत्री कृषि सिंचन योजनेच्या माध्यमातून तुषार व ठिबक सिंचनाकरीता अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना अनुज्ञेय खर्चाच्या ५५ % अथवा प्रत्यक्ष खर्चाच्या ५५ % यापैकी कमी असेल ते आणि इतर शेतकऱ्यांना अनुज्ञेय खर्चाच्या ४५ % अथवा प्रत्यक्ष खर्चाच्या ४५ % यापैकी कमी असेल ते अनुदान देय आहे. तसेच मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजना व अटल भूजल योजनेंतर्गत अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना २५% व इतर शेतकऱ्यांना ३०% पूरक अनुदान देऊन एकूण अनुक्रमे ८०% व ७५% अनुदान देय आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही. सन २०२२-२३ मध्ये एकूण ५,६६,८०७ शेतकऱ्यांची सोडतीद्वारे निवड करण्यात आली. यापैकी अनुदानास पात्र १,२९,७९५ लाभार्थ्यांना रु.३८२.८६ कोटींचे अनुदान अदा केले आहे.
(४) सदर योजना ही केंद्र पुरस्कृत योजना आहे. सबब, योजनेच्या लाभाकरीता आवश्यक असलेली किमान २० गुठ्यांची अट शिथिल करुन ती १० गुंठे करुन देण्याच्या अनुषंगाने योजनेच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये सुधारणा करण्याबाबत केंद्र शासनाकडे शिफारस केली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील सागरी किनारा मार्ग प्रकल्पाचा परिणाम लहान मच्छीमारांवर होत असल्याबाबत

**(१०) * ६७२३३ श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईसाठी महत्त्वाकांक्षी ठरलेल्या सागरी किनारा मार्ग प्रकल्पाचा परिणाम लहान मच्छीमारांवर होत असल्याचे सातत्याने कोळी समाजामार्फत निदर्शनास आणण्यात येत असतानाच टाटा समाजविज्ञान संस्थेने (टीआयएसएस) केलेल्या सर्वेक्षणातही अशीच माहिती देण्यात आली असून पारंपारिक पद्धतीने मासेमारी करणारा वर्ग यामुळे सर्वाधिक बाधीत झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबईतील नाखवा, तांडेल, खलाशी, हाताने मासे पकडणारे, कास्टनेटचा वापर करणारे व मासे विकणारे अशा विविध वर्गांवर सदर प्रकल्पाचा परिणाम झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पारंपारिक पद्धतीने मासेमारी करणाऱ्या वर्गाला दिलासा देण्यासंदर्भात तसेच त्यांना इतर मार्गाने काम उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे अंशत: खरे आहे.

सागरी किनारा मार्ग प्रकल्प हा बृहन्मुंबई महानगर पालिका यांच्यामार्फत राबविण्यात येत आहे. सदर प्रकल्पामुळे बाधीत होणाऱ्या मच्छिमारांना नुकसान भरपाई देण्याची कार्यवाही त्यांच्यामार्फत करण्यात येत असुन

मत्स्यव्यवसाय विभाग आवश्यक ते सहकार्य करीत आहे.

(२) व (३) सागरी किनारा मार्ग प्रकल्पामुळे बाधीत होत असलेल्या १३४३ मच्छिमारांची यादी बृहन्मुंबई महानगर पालिकेमार्फत या विभागास प्राप्त झालेली आहे. या यादीतील लाभार्थ्यांची पडताळणी विहित कार्यपध्दतीनुसार करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जळगाव जिल्ह्यातील केळी उत्पादक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत

**(११) * ६४६२८ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खानदेशातील जळगाव जिल्ह्यात माहे सप्टेंबर-ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान केळीवर कुकंबर मोझॅक या व्हायरसचा प्रादुर्भाव होऊन केळीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे दिनांक १४ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात केळी उत्पादक शेतक-यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्यामुळे शासनाकडून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबतची घोषणा करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यासंदर्भातील ३१ कोटी रुपयांचा प्रस्ताव अनेक महिन्यांपासून शासनाकडे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन केळी उत्पादक शेतकऱ्यांना तात्काळ नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे :** (१) अशंत: खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) निधी मागणीचा प्रस्ताव राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या निकषानुसार व दरानुसार शासनास पाठविण्याबाबत विभागीय आयुक्त, नाशिक यांना महसूल व वन विभागाद्वारे कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## हवेली (जि.पुणे) तालुक्यातील नागरिकांच्या सातबारा उताऱ्यावरील खरेदीच्या नोंदी व वारस नोंदीचे फेरफार प्रलंबित ठेवल्याबाबत

**(१२) * ६६२८५ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील कोंढवे, धावडे, वारजे, उत्तमनगर, शिवणे, आंबेगावसह हवेली तालुक्यातील तलाठी कार्यालयात ई-फेरफार नोंदी अंतर्गत मोठ्या प्रमाणात प्रकरणे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सात बारा उताऱ्यावरील खरेदी विक्रीच्या नोंदी, वारस नोंदी, अपूरे पंचनामे, मुदतीत नोटीसा न काढणे किंवा ती विहित वेळेत न बजावणे, नोंदीचे अर्ज स्विकारुन त्याची पोच पावती न देणे, बोगस तुकडाबंदी नोंदीचे गैरप्रकार इत्यादी अनेक कारणांमुळे हजारो फेरफार नोंदीची प्रकरणे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू कार्यपध्दतीमुळे नागरिकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असून गैरप्रकाराचे प्रमाण देखील वाढले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन नोंदीची सर्व प्रकरणे तातडीने निकाली काढून यांस जबाबदार असणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) हवेली तहसिल अंतर्गत कोंढवे, धावडे, वारजे, उत्तमनगर, शिवणे, आंबेगांव या गांवामध्ये दिनांक ०१/०१/२०२३ ते दिनांक १७/०७/२०२३ या कालावधीमध्ये तलाठी स्तरावर ६२६ एवढे ई-फेरफार नोंदीसाठी प्राप्त झाले. प्राप्त नोंदीपैकी ६०५ एवढ्या फेरफाराची नोंद घेण्यात आली. उर्वरित २१ फेरफार मुदतमधील नोंदी नोटीस बजावणीवर तलाठीस्तरावर प्रलंबित आहेत.

हवेली तहसिल कार्यालय अंतर्गत कार्यक्षेत्रामध्ये दिनांक ०१/०१/२०२३ ते १७/०७/२०२३ या कालावधीमध्ये दुय्यम निबंधक यांचेकडील व इतर नोंदी तलाठी यांचे स्तरावर फेरफार नोंदीसाठी १७६८२ प्राप्त झाले त्यापैकी १५६१६ एवढ्या फेरफाराची नोंदी करण्यात आली. उर्वरित २०६६ फेरफार नोंदी नोटीस तयार करणे व नोटीस बजावणीवर तलाठी स्तरावर प्रलंबित आहेत.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## संगमेश्वर (जि. रत्नागिरी) येथील शेतकऱ्यांची फसवणूक करुन जमिन घेतल्याबाबत

**(१३)** * **६९८३१ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर येथे अदानी ट्रान्समिशन प्रा.लि. कंपनीच्या वीज प्रकल्पाला दिलेल्या २८४.२७ हेक्टर वन जमिनीच्या बदल्यात कोकणातील (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) निगुडवाडी ते खुंडी आणि कुचांबे ते ओझरे अशा २० गावांमधील १२३.४६ हेक्टर जमीन शेतकऱ्यांना कोणतीही पूर्वसूचना व मोबदला न देता फसवणूक करुन वन खात्यास देण्यात आल्याचा प्रकार दिनांक २४ मार्च, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत विरोध करणाऱ्या शेतकऱ्यांना जीवे मारण्याची धमकी देण्याच्याही घटना निदर्शनास आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संपूर्ण प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू जमिनीचे सर्वेक्षण व पंचनामे करुन शेतकऱ्यांना योग्य मोबदला देणे तसेच यातील दोषींवर कारवाई करण्याकरिता कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१), (२) व (३) वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत वळतीकरणाच्या अनुषंगाने पर्यायी वनीकरणाकरीता वन विभागास उपलब्ध करून द्यावयाच्या जमिनीचा संबंधितांना मोबदला देण्याची जबाबदारी प्रकल्प यंत्रणेची असते.

मे. रायपूर-राजनांदगाव-वरोरा ट्रान्समिशन लि. यांना ७६५ के.व्ही. डि/सी ट्रान्समिशन लाईनकरीता २४८.२७ हे. वनजमीन वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत वळतीकरणाच्या अनुषंगाने कोकण विभागातील १२३.४६ हे. वनेत्तर जमीन शेतकऱ्यांना कोणतीही माहिती न देता वनविभागास हस्तांतरीत करुन फसवणूक करण्याचा आल्याचा प्रकार वन विभागाच्या निदर्शनास आलेला नाही. तथापि, लोकप्रतिनिधींनी केलेल्या तक्रारीनुसार जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांनी अपर जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांना चौकशी अधिकारी म्हणून नेमले आहे. तसेच पोलिसांनी केलेल्या चौकशीमध्ये आतापर्यंत मौ.निगुडवाडी गावातील १७ शेतकऱ्यांकडे चौकशी करण्यात आली आहे, त्या शेतकऱ्यांना जमीन विक्रीचा मोबदला मिळाला असून त्यांची कोणतीही तक्रार नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बीड व शिरुर कासार (जि.बीड) येथील शेतकऱ्यांना नियमित पीक कर्ज वाटप करण्याबाबत

**(१४) * ६९०६६ श्री.संदिप क्षिरसागर (बीड) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड व शिरुर कासार (जि.बीड) येथील अनेक शेतकरी खरीप हंगामासाठी विविध बँकांकडे पीक कर्जाची मागणी करीत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पीक कर्जासाठी रितसर अर्ज दाखल करुनही बँकांकडून शेतकऱ्यांची अडवणूक होत असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासन निर्णयानुसार नियमित पीक कर्ज वाटपाचे उद्दिष्टपूर्तीकरिता शासन तसेच मा.उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी आदेश देऊनही बँकांकडून याची अंमलबजावणी होत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बँकांकडून शेतकऱ्यांना अर्थसहाय्य मिळत नसल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजी नगर तसेच मा.उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक १२ जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांना नियमित पीक कर्ज पुरवठा करण्याबाबत तसेच संबंधित दोषी बँकांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील :** (१) होय.

(२) नाही.

(३) व (४) नाही.

सन २०२३-२४ या वित्तीय वर्षात जिल्हा स्तरीय बॅकर्स समितीने खरीप पीक कर्ज वाटपाअंतर्गत बीड तालुक्यासाठी रु.२४५.९५ कोटी इतका लक्षांक दिलेला होता. त्यानुसार दिनांक ३०.०६.२०२३ अखेर एकुण २१,८३१ शेतकऱ्यांना रु.१९९.४६ कोटी इतक्या रकमेचे कर्जवाटप करण्यात आले आहे. (लक्षांकाच्या ८१.०९%) तसेच शिरुर कासार या तालुक्यासाठी रु.५०.७० कोटी पीक कर्जवाटपाचा लक्षांक होता. त्यानुसार दिनांक ३०.०६.२०२३ अखेर एकुण ९७५४ शेतकऱ्यांना रु.६१.३६ कोटी इतक्या रकमेचे कर्जवाटप करण्यात

आले आहे (लक्षांकाच्या १२१%)

(५) जिल्हा प्रशासनाकडून पीककर्ज वाटपाबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच तालुका स्तरावर स्थानिक विधानसभा सदस्य यांच्या अध्यक्षतेखाली तालुका पीक कर्जवाटप आढावा समिती स्थापन करण्यात आलेली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील अनेक जिल्ह्यात शेतकरी कर्जमुक्ती योजनेपासून वंचित असल्याबाबत

**(१५) * ६४७६७ श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.प्राजक्त तनपूरे (राहुरी), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.पी.एन. पाटील (सडोलीकर) (करवीर), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनेक जिल्ह्यात महात्मा ज्योतीराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ अंतर्गत नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपये प्रोत्साहनपर लाभ देण्याची योजना सुरु केली असूनही प्रोत्साहन लाभ योजनेंतर्गत लाखो पात्र शेतकऱ्यांना अद्यापही प्रोत्साहनपर अनुदान मिळाले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक जिल्ह्यांमध्ये बँकांनी नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांची माहिती अपलोड केल्यानंतर पात्र शेतकऱ्यांच्या याद्या प्रसिध्द झाल्या असूनही तसेच अनेक तांत्रिक कारणांमुळे निम्म्या शेतकऱ्यांना अद्यापही या योजनेचा लाभ देण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, काही जिल्ह्यात कर्ज न घेतलेल्या शेतकऱ्यांची नावे देखील या योजनेंतर्गत समाविष्ट करुन त्यांना प्रोत्साहनपर अनुदान दिल्याचे निदर्शनास आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत पात्र वंचित शेतकऱ्यांना लाभ देण्याची कार्यवाही तातडीने करावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हा उप निबंधक यांच्याकडे दिनांक २३ जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास लेखी स्वरुपात केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या संपूर्ण प्रकरणी चौकशी करुन योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत तसेच संबंधित दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे.

(४) नाही.

(५) सदर योजनेअंतर्गत राज्यातील विविध बँकांनी सन २०१७-१८, २०१८-१९ व २०१९-२० या तीन वर्षामध्ये पीक कर्जाची उचल करुन नियमित परतफेड केलेल्या एकुण २८.८४ लाख कर्जखात्यांची माहिती योजनेच्या

संगणकीय प्रणालीवर सादर केली आहे. या पैकी १४.१८ लाख कर्जखात्यांना रु.५१५० कोटी रकमेचा प्रोत्साहनपर लाभ मंजुर करण्यात आला असुन प्रत्यक्षात १४.१४ लाख कर्जखात्यांना रु.५१३२ कोटी प्रोत्साहनपर रकमेचा लाभ देण्यात आला आहे. उर्वरित कर्जखात्यांना लाभ देण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.

गडचिरोली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेशी संलग्न सेवा सहकारी संस्था मर्या. नवेगांव माल, ता.चार्मोशी या संस्थेतील २ अपात्र सभासदांना सदर योजनेअंतर्गत लाभ देण्यात आल्याचे निदर्शनास आले होते. सदर सभासदांकडून लाभाची रक्कम वसूल करण्यात येऊन याबाबत संस्थेच्या सचिवांना निलंबित करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे बावधन विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था, मर्या, बावधन, ता.वाई, जि.सातारा या संस्थेमध्ये एका कर्जदार सभासदाच्या जागी अन्य कर्मचाऱ्याचे नाव समाविष्ठ करण्यात आल्याचे निदर्शनास आले होते. सदर प्रकरणी संस्थेचे सचिवांना निलंबित करण्यात आले असून संस्थेची चौकशी करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

### सोलापूर व जळगाव जिल्ह्यात फळपीक विमा योजनेंतर्गत विम्याच्या बोगस प्रकरणांबाबत

**(१६) * ६४९५४ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल देशमुख (काटोल), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील फळपीक योजनेत कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याच्या तक्रारींवरुन कृषी आयुक्तांनी सदर प्रकरणी चौकशी करुन कारवाईचे आदेश दिले असल्याचे दिनांक २१ मार्च, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तक्रारीनुसार केलेल्या चौकशीत शेतात कोणतेही फळपीक नसतांना पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजनेत साडेसात हजार बोगस प्रकरणे आढळून आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सोलापूर व जळगाव जिल्ह्यात जवळजवळ ८० हजार बोगस प्रकरणे असताना स्थानिक घटकांच्या विरोधामुळे उक्त प्रकरणाची चौकशी शासनास करता आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात शेतकऱ्यांना फसवून खोटी माहिती देऊन परस्पर विमा उतरवून त्यांना नाहक अडकविल्याचे आढळून आले असून त्यात ४० कोटी बोगस विमा प्रकरणे आढळून आली, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणांची शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

दिनांक २६ जून २०२३ अखेर राज्यात एकूण २,४८,९३० विमा अर्जांपैकी १,९०,४७२ विमा अर्जांची तपासणी पूर्ण झाली असून त्यापैकी १४,७९८ बोगस प्रकरणे आढळून आली आहेत.

(३) अंशत: खरे आहे.

सोलापूर जिल्ह्यातील विमा अर्जांची तपासणी पूर्ण झाली असून जळगाव जिल्ह्यातील विमा अर्जांची तपासणी सुरु आहे .

(४) होय, हे खरे आहे.

शेतकऱ्यांना फसवून खोटी माहिती देऊन परस्पर विमा घेतलेले (बोगस भाडेकरार) २७१८ विमा अर्ज आढळून आले आहेत.

राज्यात क्षेत्रीय तपासणी अंती १४७९८ बोगस विमा प्रकरणे आढळून आली असून त्यामधील केंद्र व राज्य हिस्सा अनुदानाची रक्कम रु. ५३.२७ कोटी इतकी होते.

(५) शासन निर्णय दिनांक १८ जून २०२१ मधील बाब क्र.९ नुसार बोगस विमा प्रकरणात संबंधित दोषींवर कायदेशीर कार्यवाही करण्याची जबाबदारी जिल्हा संनियंत्रण समितीच्या मार्गदर्शनानुसार संबंधित विमा कंपनीची राहिल. त्यानुसार तपासणी पूर्ण झालेल्या जिल्ह्यातील संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना बोगस विमा प्रकरणी शासन निर्णयातील तरतुदीनुसार पुढील कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## धारणी व चिखलदरा (जि.अमरावती) तालुक्यातील रोजगार हमी योजनेंतर्गत पाणंद रस्त्याच्या बांधकामात झालेला गैरव्यवहार

**(१७) * ६८४९० ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धारणी व चिखलदरा (जि.अमरावती) तालुक्यातील सन २०१६ ते २०१८ या कालावधीत रोजगार हमी योजनेंतर्गत एकंदरीत २५ किलोमीटरच्या १० कोटी रुपयांच्या एकूण ४८ पाणंद रस्त्यांच्या बांधकामात गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद यांच्या चौकशी अहवालात उक्त प्रकरणी मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार होऊन शासनाची फसवणूक करण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे : (**१) हे खरे नाही.

(२) नाही.

(३) आयुक्त (नरेगा) नागपूर यांनी प्राप्त अहवालातील कामातील अनियमीततेबाबत संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांचे विरुध्द कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार अनियमीततेस जबाबदार १३ कंत्राटी कर्मचारी यांची सेवा समाप्त करण्यात आली व २१ नियमित कर्मचारी यांचे जोडपत्र १ ते ४ संयुक्त चौकशी करीता शासनास सादर करण्यात आले आहे. सदर प्रस्तावाची शासन स्तरावर छाननी करुन त्यात काही त्रुटी असल्याचे आढळून आल्यामुळे अधिक स्पष्टता व कागदपत्रे विभागीय आयुक्त, अमरावती यांच्याकडून मागविण्यात आलेली आहेत. माहिती प्राप्त होताच विभागीय चौकशी सुरु करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जळगाव येथील गिरणा पात्रातील अवैध वाळू व गौण खनिज उत्खननाच्या अहवालाबाबत

**(१८) * ६५०२७ श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्हयात मोठ्या प्रमाणात वाळू व गौण खनिजाचे अवैधरित्या उत्खनन होत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी विभागीय आयुक्त यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे गिरणा पात्रातील बेसुमार वाळू उत्खनन व त्यावरील कारवाईचा लेखी अहवाल मागविल्याचे दिनांक २६ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणात मागील काळात केलेली कारवाई दंडात्मक वसुली तसेच अवैध गौण खनिज उत्खननाबाबतच्या ३३ तक्रारी संदर्भातील अंतिम पूर्तता अहवाल लेखी सूचना देवूनही जिल्हाधिकारी यांनी आयुक्त कार्यालयास अद्याप सादर केलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या भागात होणाऱ्या अवैध वाळू व गौण खनिजाच्या उत्खननावर नियंत्रण नसल्यामुळे शासनाच्या महसूलाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या संपुर्ण प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींवर तसेच जबाबदार अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : (**१), (२), (३), (४), (५) व (६) दैनिक लोकमत या वृत्तपत्रात दिनांक १८/०५/२०२३ रोजी प्रसिध्द झालेल्या बातमीच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांनी त्यांच्या दिनांक १९/०५/२०२३ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, जळगाव यांचेकडून अहवाल मागविलेला होता. जिल्हाधिकारी जळगाव यांनी सदर अहवाल दिनांक ०१/०६/२०२३ च्या पत्रान्वये विभागीय आयुक्त, नाशिक यांना सादर केला आहे.

सदर अहवालात नमूद केल्याप्रमाणे गिरणा नदीपात्रातून कोणत्याही प्रकारचे अवैध उत्खनन झाल्याचे आढळून आले नाही.

जळगाव जिल्हयातील अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूक प्रकरणी ३३ तक्रारी प्राप्त झाल्या असून २९ तक्रारी निकाली काढल्या आहेत. ३ तक्रारी उपविभागीय अधिकारी/तहसिलदार यांचेकडे प्रलंबित असून १ तक्रार न्यायप्रविष्ठ आहे.

जळगाव जिल्हयात दिनांक १/४/२०२२ ते ३१/३/२०२३ दरम्यान अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूक प्रकरणी एकूण ६४७ प्रकरणांमध्ये रक्कम रुपये १०,३८,८०,०००/- दंड आकारुन ११२ प्रकरणी गुन्हे दाखल करुन १९३ आरोपींना अटक केली आहे.

जळगाव जिल्ह्यातील गौण खनिजाच्या अवैध उत्खननास व वाहतूकीस आळा घालण्यासाठी महसूल, परिवहन व पोलिस यांच्या संयुक्त पथकामार्फत वेळोवेळी कारवाया करण्यात येतात.

----------------

## बेळगांव व केळगांव (ता.केज, जि.बीड) येथील रोजगार हमी योजनेंतर्गत कामात झालेला गैरव्यवहार

**(१९) * ६६०६८ श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बेळगांव व केळगांव (ता.केज, जि.बीड) या गट ग्रामपंचायत अंतर्गत सन २०१० ते २०२० या कालावधीत रोजगार हमी योजनेंतर्गत रस्ते व जलसिंचन विहिरीची मोठ्या प्रमाणात कामे हाती घेण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामे फक्त कागदोपत्री दाखवून स्थानिक प्रशासकीय यंत्रणेच्या संगनमताने कामगारांचे जॉब कार्ड व खोट्या सह्या करुन कोट्यवधी रुपयांची देयके काढून मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार करण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात तक्रारीनंतर मुख्य कार्यकारी अधिकारी, बीड यांनी नेमलेल्या चौकशी पथकाने अपूर्ण व त्रोटक चौकशी केल्याबाबत त्यांचेवर कारवाई करण्यासंदर्भात श्री.प्रताप नरसिंग दातार यांनी माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान आझाद मैदान, मुंबई येथे आमरण उपोषण केले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी रोजगार हमी योजना, मा.मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे दिनांक ४ फेब्रुवारी, २०२३ व दिनांक २१ मार्च, २०२३ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रकरणातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) श्री.प्रताप नरसिंग दातार यांनी आझाद मैदान, मुंबई येथे केलेले उपोषण, ग्रा.पं. केळगांव व बेळगांव येथील मग्रारोहयोच्या कामामध्ये झालेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करण्यासाठी होते.

(४) हे खरे आहे.

(५) सदर प्रकरणातील तक्रारीनुसार या प्रकरणी नियुक्ती केलेल्या चौकशी पथकाने संबंधित कामांची तपासणी जायमोक्यावर जाऊन चौकशी करण्यात आली आहे. त्यानुसार सदर प्रकरणी कामे झालेली आहेत. तसेच याप्रकरणी सदरहू तक्रारदार यांना आवश्यक ते पुरावे/अभिलेखे सादर करण्यासाठी वारंवार सुनावणीची संधी देण्यात आली होती.

तथापि सदरबाबत तक्रारदार उपस्थित नव्हते तसेच त्यांनी संबंधित पुरावे सादर केलेले नाहीत.

याशिवाय सदर सन २०१० ते २०२० या कालावधीतील संवैधानिक लेखापरिक्षण मुद्याच्या आधारे मा. उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद येथे जनहित याचिका क्र.०२/२०२० दाखल झालेली असून प्रकरणी लेखापरिक्षणातील अहवालाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येत असते. मा.उच्च न्यायालयात वेळोवेळी अहवाल देण्यात येत आहे. सद्यस्थितीमध्ये सदर प्रकरण मा. उच्च न्यायालयात सुरू आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भामरागड, अहेरी व मुलचेरा (जि.गडचिरोली) या तीन तालुक्यातील महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेंतर्गतच्या कामांमध्ये गैरप्रकार झाल्याबाबत

**(२०) * ६९९८१ श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भामरागड, अहेरी व मुलचेरा (जि.गडचिरोली) या तीन तालुक्यातील महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेंतर्गत कामे न करताच करोडो रुपयांची बोगस देयके दाखवून रकमेची उचल केल्यासंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली यांचेकडे तक्रार करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली यांनी गठित केलेल्या समितीच्या अहवालामध्ये या तीन पंचायत समितीचे अधिकारी व कर्मचारी दोषी असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच पंचायत समितीतील गटविकास अधिकारी, विस्तार अधिकारी, शाखा अभियंता, नरेगा तांत्रिक अधिकारी (टि.पी.ओ.) तसेच बोटनफुंडी, ईरूपडूम्मे, मडवेली, मन्नेराजाराम, येचली, पल्ली, विवेकानंदपूर सुंदरनगर शांती ग्राम व येल्ला ग्रामपंचायतीचे सचिव असे एकूण २३ अधिकारी व कर्मचारी दोषी असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची संपूर्णत: चौकशी करण्यात आली नसून मुख्य दोषींवर कारवाई न करता त्यांच्या दबावाखाली काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांवरच कारवाई करुन प्रकरण बंद करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) हे खरे नाही.

(५) सदर प्रकरणी प्राप्त झालेल्या चौकशी अहवालनुसार भामरागड, अहेरी व मुलचेरा तालुक्यातील संबंधित अधिकारी व कर्मचारी यांना अनियमिततेसाठी जबाबदार धरण्यात आले आहे. प्रस्तूत प्रकरणी सखोल चौकशीच्या अनुषंगाने संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. त्यानुसार पुढील प्रशासकीय कार्यवाही करण्यात आली आहे. प्रकरणातील भामरागडचे गटविकास अधिकारी यांच्यावरील शिस्तभंगविषयक कारवाई करण्याकरीता विभागीय आयुक्त, नागपूर यांच्याकडे दोषारोप पत्र सादर करण्यात आले आहे व एका गट विकास अधिकाऱ्याला कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.

या प्रकरणी जबाबदार असलेल्या तीन ग्रामसेवक यांना निलंबित करण्यात आले आहे व एका ग्रामसेवकास कारणे दाखवा नोटीस दिली आहे. त्यांच्यासह एक शाखा अभियंता व उर्वरित चार ग्रामसेवक यांच्यावर विभागीय चौकशीची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. या प्रकरणात एक गटविकास अधिकारी, दोन कनिष्ठ अभियंता, दोन विस्तार अधिकारी व दोन सहायक लेखा अधिकारी यांचेवर प्रचलित नियमानुसार प्रशासकीय कारवाई करण्यात आली आहे. आणि एक तांत्रिक सहायक (कंत्राटी) यांची सेवा समाप्ती करण्याची कार्यवाही सुरू आहे. व एक तांत्रिक सहायक (कंत्राटी) यांना दंडाची शिक्षा करण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

**मौजे अजंग-कासविहीर (ता.जि.धुळे) येथे वर्ग-२ च्या खाजगी शेतजमिनीतून गौण खनिजाचे होत असलेले अवैध उत्खनन**

**(२१) * ६५४५५ डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल देशमुख (काटोल), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे अजंग-कासविहीर (ता.जि.धुळे) येथील वर्ग-२ च्या खाजगी शेतजमिनी व सरकारी जमिनीतून गौण खनिजाचे अवैधरित्या उत्खनन करुन कोट्यवधी रुपयांची रॉयल्टी बुडविल्याचे माहे एप्रिल-मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उत्खनन स्थानिक ग्रामसेवक, तलाठी व मंडळ अधिकारी यांच्यासह तहसिलदार व उपविभागीय अधिकारी, धुळे यांच्या संगनमताने सुरु असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत लोकशाही दिनी तसेच लेखी निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी, धुळे यांच्याकडे वारंवार तक्रारी देवूनही अद्यापही कोणतीच कारवाई झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन गौण खनिज उत्खनन रोखणे व रॉयल्टी वसुली करणे तसेच संबंधित दोषींविरुध्द कारवाई करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१), (२), (३), (४) व (५) मौजे अजंग कासविहीर येथील वर्ग २ च्या खाजगी जमिनीतून गौणखनिज अवैधरीत्या उत्खनन करून रॉयल्टी बुडवल्याबाबत तक्रारदारांनी तालुका लोकशाही दिनात तसेच जिल्हास्तरीय लोकशाही दिनामध्ये तक्रार अर्ज दाखल केला.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने सहाय्यक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, धुळे यांच्यामार्फत चौकशी करण्यात आली असून सदर तक्रारदारांच्या तक्रारी ह्या निरर्थक व तथ्यहीन असल्याचे अहवालात निष्पन्न झाले आहे.

-----------------

**राज्यातील दुग्ध व्यवसाय वाढीसाठी उपाययोजना करण्याबाबत**

**(२२) * ६४७७० श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल देशमुख (काटोल), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.अतुल बेनके (जुन्नर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.योगेश सागर (चारकोप):** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांच्या उपजिविकेचे महत्वाचे साधन असलेला दूध व्यवसाय अडचणीत आलेला असून महानंद, आरे, गोकुळ इ. अनेक नामांकित दुध संघ आर्थिक अडचणीत सापडले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्याबाहेरील कंपन्यांचे दूध संकलन, विक्री व विस्तार, राज्यातील दूधाला कमी भाव, दूध भेसळ, दूध संघातील मनमानी, गैरव्यवहार व स्थानिक राजकारण इ. अनेक कारणांमुळे राज्यातील दूध संघ प्रचंड तोट्यात जात असून त्यांना प्रशासकीय खर्च काढणे देखील कठीण जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे राज्यातील अनेक दूध संकलन केंद्रे व दुग्धजन्य पदार्थ निर्मिती करणाऱ्या कंपन्या देखील बंद होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील दुग्ध व्यवसाय आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) महानंद ही शिखर दुग्ध सहकारी संस्था विविध कारणांमुळे आर्थिक अडचणीत आलेली आहे हे खरे आहे. तसेच आजस्थितीत आरेचे दूध संकलन निरंक झाले आहे. तथापि, राज्यातील इतर सहकारी संघ (गोकूळ व इतर) आर्थिक अडचणीत सापडले आहेत हे खरे नाही.
(२) राज्यात दुग्धव्यवसायात खाजगी क्षेत्राचा वाटा प्रचंड प्रमाणात वाढला आहे. खाजगी क्षेत्राकडून त्यांची विक्री व विस्तार वाढण्यासाठी विविध आधुनिक विपणन पध्दतींचा अवलंब करण्यात येतो. त्याचा परिणाम सहकारी क्षेत्रावर पर्यायाने त्यांच्या विक्री व्यवस्थेवर होतो. याचा सर्वात जास्त विपरीत परिणाम हा महानंद या शिखर संस्थेवर झाला असून, सदर संस्थेला त्यांचा दैनंदिन खर्च भागविणेही कठीण झाले आहे.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) सहकार क्षेत्रातील दुग्धव्यवसायाच्या गुणात्मक वाढीसाठी उपाययोजना करण्याच्या दृष्टीने शासन निर्णय दिनांक २१.४.२०२३ अन्वये मा.मंत्री (दुग्धव्यवसाय विकास) यांचे अध्यक्षतेखाली अभ्यास गट गठीत करण्यात आलेला आहे.

-----------------

## धानिवरी (ता.डहाणू, जि.पालघर) येथील आदिवासी कुटूंबाना मोबदला न देता जमिन संपादित केल्याबाबत

**(२३) * ६४६२२ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल देशमुख (काटोल), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धानिवरी (ता.डहाणू, जि.पालघर) येथील सर्व्हे क्र. ६४/२ व ८१/१ येथील जमीन मुंबई-बडोदा मार्गासाठी संपादित केली जात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या जमिनीवरील आदिवासी कुटूंबांना मोबदला न देताच सक्तीने स्थलांतरित करताना महिला पोलिसांनी महिला आणि बालकांना अमानुष वागणूक दिल्याचे दिनांक १९ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू घटनास्थळी तात्काळ भेट देऊन संबंधित अधिकारी व पोलिस अधिकारी-कर्मचाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याबाबत तेथील लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी, पालघर यांच्याकडे तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी अप्पर जिल्हाधिकारी, पालघर यांच्या अध्यक्षतेखाली चार सदस्यीय समिती गठीत करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करुन बाधित आदिवासी कुटुंबांना जमिनीचा योग्य मोबदला देऊन तसेच सुरक्षित ठिकाणी स्थलांतरण करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) पालघर जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी संबंधित अधिकारी व पोलीस अधिकारी-कर्मचाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याबाबत अशा आशयाची जिल्हाधिकारी, पालघर यांचेकडे दिनांक २५ एप्रिल, २०२३ रोजी तक्रार केली आहे. या प्रकरणातील तपशिल आणि सदर तक्रारीच्या अनुषंगाने या प्रकरणी अपर जिल्हाधिकारी, पालघर यांच्या अध्यक्षतेखाली ५ सदस्यीय चौकशी समिती गठीत करण्यात आली असुन, गठीत समितीचा अहवाल अप्राप्त आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (का.),**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.